


दैनिक
अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १९६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## आदिवासी बांधवांना अंत्यविधीसाठी जागा का नाही?



### आ. काशिनाथ दाते यांची ज्वलंत प्रश्नावर लक्षवेधी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी सुरू असलेल्या अधिवेशनात राज्यातील बहुतांश आदिवासी बांधवांना अंत्यविधीसाठी जागा उपलब्ध नसल्याचा गंभीर मुद्दा सभागृहात उपस्थित केला. कर्जत तालुक्यातील पाटेवाडी येथे एका आदिवासी महिलेच्या निधनानंतर अंत्यविधीसाठी जागा उपलब्ध नसल्याने निर्माण झालेल्या परिस्थितीकडे लक्ष वेधत त्यांनी शासनाला जाब विचारला.

आ. दाते यांनी सभागृहात बोलताना संबंधित महिलेचे निधन २२ सप्टेंबर २०२४ रोजी झाले. मात्र स्मशानभूमी उपलब्ध नसल्याने अंत्यविधी उशिरा पार पडला. या घटनेमुळे आदिवासी समाजाच्या मूलभूत हक्कांचा प्रश्न निर्माण झाला असून, अशा घटना राज्यात इतरत्र घडत आहेत का, याची चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली. या प्रश्नाद्वारे आमदार काशिनाथ दाते यांनी आदिवासी समाजाच्या सन्मानाचा व मूलभूत अधिकारांचा मुद्दा प्रभावीपणे मांडला.अंत्यसंस्कारासाठीही जागा न मिळणे ही अत्यंत वेदनादायी बाब आहे; शासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी ठाम भूमिका त्यांनी सभागृहात मांडत सामाजिक न्यायाचा मुद्दा अधोरेखित केला. मतदारसंघातील तसेच राज्यातील वंचित घटकांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणारे नेतृत्व म्हणून आमदार दाते पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत.

**आ. दाते यांनी संवेदनशील प्रश्न केला पाटेवाडी येथे पूर्वी वनविभागाच्या जागेत अंत्यविधी केले जात होते; मात्र एका तक्रारीमुळे संबंधित प्रकरणात अडचण निर्माण झाली. ग्रामपंचायतीने तत्काळ ठराव करून स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव तहसीलदारांकडे सादर केला आहे. तसेच जिल्ह्यात ज्या गावांमध्ये स्मशानभूमी उपलब्ध नाही, अशा गावांची माहिती संकलित करण्यात आली असून विशेष मोहिमेद्वारे जागा उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.**

**मूलभूत सुविधा योजनेंतर्गत स्मशानभूमीचे काम मंजूर असल्यास त्या गावांना प्राधान्य देण्यात येईल. जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी यांना यासंदर्भात पत्राद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत.**

**ना. जयकुमार गोरे,**
**ग्रामविकास मंत्री**

## बोली भाषा हे महाराष्ट्राचे वैभव - मधु मंगेश कर्णिक

### बोली भाषांचा जागर करीत झाले उद्घाटन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, नाशिक :** बोली भाषा हे महाराष्ट्राचे वैभव आहे. याच बोली भाषांनी मराठी भाषेला समृद्ध आणि संपन्न केले आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांनी येथे केले.

चौथे विश्व मराठी संमेलन २७ फेब्रुवारीपासून मराठा विद्याप्रसारक समाजाच्या केटीएचएम महाविद्यालयाच्या प्रांगणात होत आहे. या पार्श्वभूमीवर आज बोली भाषांचा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. या महोत्सवाचे उद्घाटन श्री. कर्णिक यांच्या हस्ते महाकवी कालिदास कलामंदिरात आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ड. नितीन ठाकरे, मराठी भाषा विकास विभागाचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. प्रदीप ढवळ, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष उत्तम कांबळे, डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, डॉ. मिलिंद जोशी, विश्वास ठाकूर आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल साहित्यिकांचा सत्कार करण्यात आला.




श्री. कर्णिक म्हणाले की, महाराष्ट्र हे साहित्य, कला, संगीताला महत्व देणारे राज्य आहे. हजारो वर्षांपासून बोली भाषा महाराष्ट्राच्या मातीत रुजलेल्या आहेत. बोली भाषेला महत्व दिले, तर मराठी भाषा समृद्ध होईल. राज्य शासनाने सुरू केलेल्या या महोत्सवाच्या माध्यमातून मराठी भाषा समृद्ध होण्यास मदत होणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी म्हणाले, मराठी भाषा ही ज्ञान आणि तंत्रज्ञानाची भाषा व्हावी. बोली भाषांना संजीवनी मिळाली, तर मराठी ही ज्ञान भाषा होईल. बोली भाषा समृद्ध झाल्या, तर मराठी भाषा समृद्ध होईल. त्यासाठी बोली भाषांना प्रतिष्ठा प्राप्त करून द्यावी. आठवीच्या वर्गापासून भाषा विज्ञान शिकवावे, असेही त्यांनी सांगितले.

डॉ. मिलिंद जोशी म्हणाले, साहित्यिक वि. वा. शिरवाडकर यांचे नाशिक हे साहित्य तीर्थ आहे. बोली भाषांचे महत्व नाकारून चालणार नाही. बोली भाषा या मराठी भाषेसाठी जीवनवाहिन्या आहेत, असे सांगितले.

यावेळी श्री. कर्णिक यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे, कवी प्रकाश होळकर, सुरेखा बोऱ्हाडे, रमेश पडवळ, डॉ. प्रतिभा जाधव, विद्या सुर्वे, सुनील ढगे, रवींद्र कदम, डॉ.विजय काकतकर, चारुदत्त दीक्षित आदींचा सत्कार करण्यात आला.

## या वर्षा अखेर सुरू होणार कर्जत पनवेल रेल्वे सेवा



**प्रकल्पाचे मुख्य अभियंता योगेश शर्मा यांनी सांगितले की, हा प्रकल्प आधुनिक अभियांत्रिकी कौशल्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. भौगोलिक व तांत्रिक अडचणींवर मात करताना विशेषत: किरावली बोगद्याच्या खोदकामासाठी सखोल भू-वैज्ञानिक अभ्यास, नियंत्रित स्फोट तंत्र आणि अस्थिर खडकातून सुरक्षित मार्ग तयार करण्यासाठी मजबूत आधाररचना उभारावी लागली.**

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२६, मुंबई :** पनवेल ते कर्जत दरम्यान रेल्वेने प्रवास करण्याचे स्वप्न आता लवकरच सत्यात उतरणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या पनवेल-कर्जत रेल्वे कॉरिडोरचे ८५ टक्के काम पूर्ण झाले असून, रेल्वे प्रशासनाने हा प्रकल्प चालू वर्षाच्या अखेरीस पूर्ण करण्याचे लक्ष ठेवले आहे. सुमारे २,७८२ कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प आधुनिक अभियांत्रिकीचा एक उत्तम नमुना मानला जात आहे.

रेल्वे प्रशासनाच्या माहितीनुसार या प्रकल्पाचे सुमारे ८५ टक्के काम पूर्ण झाले असून चालू वर्षाच्या अखेरीपर्यंत संपूर्ण काम पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. या कॉरिडोरची एकूण लांबी २९.६ किलोमीटर आहे. दुहेरी मार्गिकेच्या (डबल लाईन) ट्रॅकपैकी सुमारे ७० टक्के काम पूर्ण झाले आहे. पनवेल ते कर्जत दरम्यानचे दोन रेल्वे फ्लायओव्हर पूर्ण झाले असून तीन बोगद्यांचे (टनल) बांधकाम करण्यात आले आहे. या बोगद्यांची एकूण लांबी सुमारे ३.२ किलोमीटर असून त्यासाठी अंदाजे ३०० कोटी रुपये खर्च झाला आहे. संपूर्ण प्रकल्पाचा खर्च सुमारे २,७८२ कोटी रुपये आहे. २९ किलोमीटर मार्गावर ५ रोड ओव्हर ब्रिज आणि १५ रोड अंडर ब्रिजचे काम पूर्ण झाले आहे. पनवेल, चिखले, पोंयेन्जे, चौक आणि कर्जत ही सुरूवातीची स्थानके असून त्यांचे कामही प्रगती पथावर आहे. हा कॉरिडोर सुरू झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कर्जत प्रवासाचा वेळ सध्याच्या कल्याण मार्गावरील रेल्वे लाईनच्या तुलनेत लक्षणीयरीत्या कमी होणार आहे. या मार्गामुळे नवी मुंबई व पनवेल परिसरात कामासाठी ये-जा करणाऱ्या कर्जत परिसरातील प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे.

## मुस्लिमांचे ५ टक्के आरक्षण रद्द; मुंब्र्यात जोरदार आंदोलन




**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२६, ठाणे :** सन २०१४ मध्ये मुस्लिमांना दिलेले पाच टक्के आरक्षण रद्द करण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. त्यानिषेधार्थ मुंब्रा येथे विरोधी पक्ष नेते शानू पठाण आणि नगरसेविका मर्जिया पठाण यांच्या नेतृत्वाखाली जोरदार आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी शानू पठाण यांनी, मुस्लिमांना आरक्षण न दिल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आघाडी सरकारने दिलेल्या आरक्षणानंतर प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. पण आता राज्य शासनाकडून सुधारित शासन निर्णय प्रकाशित करण्यात आला आहे.

आरक्षणाचा शासनादेश आणि परिपत्रक जारी करण्यात आलं असून, त्यात आरक्षण रद्द करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. त्यानिषेधार्थ दुपारचा नमाज अदा केल्यानंतर दारूल फलाह मशिद येथे हे आंदोलन करण्यात आले. मुस्लिम समाज शैक्षणिकदृष्ट्या अद्यापही मागास आहे. तसेच, शासकीय नोकऱ्यांमध्येही मुस्लीम समाजाला प्रतिनिधीत्व मिळत नाही. ते मिळावे, यासाठी हे आरक्षण देण्यात आले होते. मात्र, आता हे आरक्षण रद्द करून मुस्लिमांवर अन्याय केला जात असल्याचा आरोप यावेळी आंदोलकांनी केला. या प्रसंगी आंदोलकांनी सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. तसेच, हातात, मुस्लीम आरक्षण मिळालेच पाहिजे, महायुती सरकार हाय हाय, असे संदेश दिलेले फलक घेतले होते. या प्रसंगी शानू पठाण यांनी, सब का साथ, सब का विकास, अशी घोषणा देणारे हे सरकार भेदभावाचे राजकारण करीत आहे. एकूण लोकसंख्येच्या १८% असलेला मुस्लीम समाज सामाजिकदृष्ट्या मागास आहे. आर्थिक मागासलेपण असल्याने शैक्षणिक प्रगती होऊ शकत नाही. अशा स्थितीत हे आरक्षण रद्द करून अन्याय केला जात आहे. त्याविरोधात आमचा हा संघर्ष आहे, असे सांगितले.

मर्जिया पठाण यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, सच्चर आयोगाची अंमलबजावणी करताना सामाजिक, आर्थिक मागास असलेल्या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षणाची गरज असल्याचे म्हटले आहे. संविधानातही मागासलेपण दूर करण्यासाठी आरक्षणाची आवश्यकता व्यक्त केली आहे. आरक्षण हा अधिकार आहे. तोच काढून घेण्यासाठी फक्त मुंबईतील आलेख तपासला जात आहे. पण, हे सरकार फक्त मुंबईसाठी निवडून आलेले नाही. ते सबंध राज्याचे आहे ना? मग, गोरगरीब मुस्लीम समाजावर अन्याय का केला जात आहे? संविधानाने शोषीत, पीडित वर्गाला त्यांचा दर्जा उंचावण्याचा अधिकार दिला आहे. याची जाणीव ठेवून नवीन वटहुकूम काढून चालू अधिवेशनातच मुस्लीम आरक्षणाचा कायदा करावा, अशी मागणी केली.

## बरुरच्या आदिशक्ती फायनान्सकडून ठेवीदारांची एक कोटी ११ लाख रुपयांची केली फसवणूक

### दोघांविरुद्ध मंद्रुप पोलीसात गुन्हा दाखल




**प्रकाश इटकर यांनी केली आत्महत्या**

या प्रकरणात गुन्हा दाखल झालेले प्रकाश इटकर यांनी ९ नोव्हेंबर २३ रोजी बरुर येथील आपल्या शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली होती. कारण इटकर यांनी त्यांच्या आदिशक्ती फायनान्स मध्ये अनेकांच्या ठेवी घेतल्या होत्या. बरुर व परिसरातील गोरगरीब कुटुंबातील अनेकांनी आपले कष्टाचे पैसे ठेवले होते. हे पैसे परत करण्यासाठी त्यांच्या मागे ठेवीदारांनी तगादा लावला होता. मात्र त्यांनी पैसे देण्यास सतत टाळाटाळ केली. शेवटी आर्थिक विवंचनेतून त्यांनी आत्महत्या केली.

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.२६, सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील बरुर येथील आदिशक्ती फायनान्समध्ये ठेवीदारांना आकर्षक व्याजदराचे आमिष दाखवून ४७ जणांच्या एक कोटी ११ लाख १७ हजार ६३० रुपयांच्या ठेवी परत न करता त्यांची फसवणूक केल्याप्रकरणी दोघा बापलेकांच्या विरुद्ध मंद्रुप पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. मयत प्रकाश मुकुंदा इटकर व त्यांचा मुलगा संजय प्रकाश इटकर राहणार बरूर (ता. दक्षिण सोलापूर) असे या प्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या दोघांची नावे आहेत.

याबाबतची माहिती अशी की, बरुर येथे प्रकाश इटकर व संजय इटकर यांनी श्री. आदिशक्ती फायनान्स सुरू केले होते. यासाठी त्यांनी गावातील ठेवीदारांना वार्षिक २४ टक्के व्याजदराचे आमिष दाखवत ठेवी स्वीकारल्या. इटकर हे गावातील व्यक्ती असल्याने त्यांच्यावर विश्वास ठेवत अनेकांनी ठेवी ठेवल्या. १ जानेवारी २० ते ३१ डिसेंबर २३ या कालावधीत फिर्यादीसह अनेकांनी ठेवी ठेवल्या. त्यात महिलांची संख्या ही मोठी होती. मात्र त्यानंतर ठेवीदारांनी पैशाची मागणी केल्यानंतर त्यांना इटकर यांनी पैसे परत दिले नाही.

दरम्यान याप्रकरणी निर्मला चौगुले यांनी २६ फेब्रुवारी रोजी मंद्रुप पोलीस ठाण्यात इटकर यांच्या विरुद्ध बेकायदेशीर ठेवी घेऊन व व्याजाचे आमिष दाखवून फसवणूक केल्याची फिर्यादी दिली. त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, इटकर यांनी बरूर येथील आदिशक्ती फायनान्समध्ये मला २४ टक्के आकर्षक व्याजदराचे आमिष दाखवून पैसे ठेवण्यास सांगितले. त्यानुसार मी २८ फेब्रुवारी २०२३ रोजी ९ लाख ४० हजार रुपये त्यांच्या फायनान्स मध्ये ठेवले. नंतर पैशाची मागणी केली असता व्याज व ठेवी देण्यास त्यांनी टाळाटाळ केली. माझ्यासह ४७ जणांच्या पिग्मी व रोख स्वरूपात ठेवी स्वीकारून त्यांनी त्या परत केल्या नाहीत.

# भोंदू साधूच असतात का ?



महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची एक जाहिरात नुकतीच पाहण्यात आली. 'स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवा. भोंदूगिरीवर नाही' असा संदेश या जाहिरातीतून देण्यात आला आहे. या जाहिरातीत एका साधुचे व्यंगचित्र रेखाटण्यात आले आहे. दाढी आणि जटाधारी साधूच्या दंडाखाली छटी दाखवण्यात आली असून हातात कमंडळू रेखाटण्यात आले आहे. कपाळावर भस्म, दंड, मनगट आणि जटेला रुद्राक्षाच्या माळा दाखवण्यात आल्या आहेत. तर कटीला व्याघ्रचर्म गुंडाळलेले दिसत आहे. या व्यंगचित्राच्या माध्यमातून भोंदू साधु असे दिसतात हे सरकारला दाखवायचे आहे का ? साधूच्या कपाळावर रेखाटण्यात आलेले भस्म हे भगवान शिवांच्या वैराग्याचे प्रतीक आहे. दंडाला रुद्राक्षाच्या माळा, कटीला व्याघ्रचर्म, दंडाला छटी आणि हाती कमंडलू ही सुद्धा भगवान शिवांच्या आणि दत्तगुरूंच्या चित्रांमध्ये आणि मुर्त्यांमध्ये आपल्याला प्रकर्षाने दिसून येतात. त्यामुळे शिवभक्तांना आणी दत्त भक्तांना या साऱ्या गोष्टी वंदनीय आहेत. या साऱ्या बाबी वैराग्याचे प्रतीक असल्याने संसारातील सुख सुविधांचा त्याग केलेले साधू संत सुद्धा या गोष्टी आपल्या जवळ बाळगतात. मोहमायेचा परित्याग करून ईशचिंतनामध्ये आपले उर्वरित अखंड आयुष्य समर्पित करणारे आणि जगाच्या कल्याणासाठी हिमालय आणि तत्सम निर्जन ठिकाणी वर्षोनुवर्षे ध्यानधारणा करणारे साधू संत हे या भारतभूमीचे एक वेगळे वैशिष्ट्य आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने त्यांचे विराट रूप आपल्याला पाहायला मिळते. पुढच्या वर्षी नाशिक नगरीत साधू संतांची हीच मांदियाळी आपल्याला राज्यात अवतरलेली पाहायला मिळणार आहे. साधूंना भोंदू म्हणून हिणवणारी राजकीय मंडळी त्यावेळी आलेल्या साधू संतांच्या चरणाशी लोटांगण घालताना दिसून येतील. त्यामुळे साधू हे भोंदू असतात कि समाजातील दीनदुबळ्यांचे कल्याण करणारे असतात हे सरकारला आधी ठरवावे लागेल. सरकारी जाहिरातीवर भोंदू म्हणून साधूचे व्यंगचित्र दाखवणे म्हणजे सरसकट सर्वच साधूंना भोंदू म्हणून हिणवण्याचा प्रकार नव्हे का ? आज भोंदूगिरी केवळ हिंदू धर्मातच आहे का ? आजही अनेक दर्ग्यांमध्ये भूतबाधा काढण्याच्या नावाखाली लोकांना साखळदंडाने बांधले जाते, त्यांना धुरी दिली जाते, वेताच्या काठीने मारहाण केली जाते, चटके दिले जातात. ही भोंदूगिरी सरकारला दिसत नाही का ? पांढऱ्या वेशात दारोदारी येऊन, लोकांना फुकटात पुस्तिका वाटणारी, असाध्य रोग बरे करण्याच्या दावा करणारी, तुमचे देव विसर्जन करण्यास सांगणारी, लोकांच्या गरिबीचा आणि असहायतेचा फायदा घेऊन काही पैशांच्या, अन्नाच्या किंवा वैद्यकीय सुविधांच्या बदल्यात त्यांचे धर्मांतरण करणारी आणि हजारोंच्या उपस्थितीत स्टेजवर एडस, कॅन्सर सारखे असाध्य रोग आम्ही बरे करतो असे छातीठोकपणे सांगणारी सुटाबुटातील भोंदूगिरी सरकारला दिसत नाही की त्याकडे जाणून बुजून दुर्लक्ष केले जात आहे. हिंदू हा सहिष्णू आहे. त्याला धर्माचे ज्ञान आणि अभिमान दोन्ही नसल्याने त्याला नेहमीच गृहीत धरले जाते. परिणामी साधू संत म्हणजे हल्ली टिंगलटवाळीचा विषय ठरू लागला आहे. सिनेमा, वेब सिरीज, नाटके, जाहिराती यांमध्ये त्यांची नेहमीच अवहेलना केली जाते परिणामी दारी भिक्षेच्या अथवा माधुकरी मागण्याच्या हेतूने आलेल्या साधुंकडे संशयास्पद रीतीने पाहिले जाऊ लागले आहे. लहान मुले या साधूंची टिंगलटवाळी करू लागले आहेत. काही वर्षांपूर्वी पालघर परिसरात अशाच प्रकारे संशयाने साधूंची मारहाण करून हत्या करण्यात आली होती. त्यामुळे साधूंची निदानालस्ती करणे योग्य नाही. सध्या राज्यात असलेल्या हिंदुत्ववादी सरकारकडून तरी ही अपेक्षा नव्हती. समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी सरकार करत असलेले प्रयत्न नक्कीच कौतुकास्पद आहेत मात्र हे करत असताना ज्यांनी आपल्याला निवडून दिले आणि सरकार स्थापनेची संधी दिली त्या हिंदू समाजाच्या श्रद्धेला या जाहिरातीमुळे तडा गेला आहे त्यामुळे सरकारने हिंदूंच्या भावनांची दखल घेत या जाहिरातींवरील साधूंचे चित्र हटवावे !

**– जगन घाणेकर**

# माझी मराठीची बोलू कौतुके... परी अमृतातही पैजा जिंके.....




**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**


मराठी ही आपली मातृभाषा आहे तसेच ती महाराष्ट्राची राज्यभाषाही आहे. २७ फेब्रुवारी हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात राजभाषा दिन म्हणून साजरा केला जातो. आपल्या शैलीदार लेखणीतून ज्यांनी मराठी भाषेला मोठ्या उंचीवर नेऊन ठेवले ते जेष्ठ साहित्यिक ज्ञानपीठ विजेते वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रजांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस. कुसुमाग्रजांना १९८७ साली ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. हा मराठी भाषेला मिळालेला पहिला ज्ञानपीठ पुरस्कार होता. त्यामुळे त्यांचा जन्मदिवसच मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा करण्यास महाराष्ट्र शासनाने सुरवात केली. भारतातील २२ प्रमुख भाषांपैकी मराठी ही एक प्रमुख भाषा आहे. महाराष्ट्र आणि गोवा राज्याची मराठी ही अधिकृत राजभाषा आहे. मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकसंख्येनुसार मराठी ही पंधरावी तर देशातील तिसरी भाषा आहे. २००१ च्या लोकसंख्येनुसार मराठी बोलणाऱ्यांची एकूण लोकसंख्या दहा कोटींच्या पुढे आहे. मराठी भाषा ९ व्या शतकापासून प्रचलित आहे. मराठी भाषेची निर्मिती संस्कृतपासून झालेल्या महाराष्ट्री प्राकृत व अपभ्रंश या भाषांपासून झाली आहे. मराठी भाषेला गौरवपूर्ण इतिहास आहे. देशातीलच नव्हे तर जगातील प्रमुख भाषा म्हणून मराठीकडे पाहिले जाते. ज्ञानेश्वरांपासून कुसुमाग्रजांपर्यंत अनेकांनी मराठी भाषेला समृद्ध करण्याचा प्रयत्न केला.

**माझी मराठीची बोलू कौतुके**
**परी अमृतातही पैजा जिंके**
**ऐसी अक्षरे रसिके....मेळवीन**

**अशा शब्दात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी मराठीचा गौरव केला आहे.**

**लाभले आम्हास भाग्य...**
**बोलतो मराठी...**

अशा शब्दात कविश्रेष्ठ सुरेश भटांनी मराठीचा गौरव केला आहे.

एक हजार वर्ष जुनी, पाच हजार बोली भाषेपासून तयार झालेली, अमृतातही पैज जिंकणाऱ्या या माय मराठी भाषेच्या जपणुकीसाठी आपण काय करतो याचा प्रत्येकाने विचार करायला हवा. आज हिंदी आणि इंग्रजी भाषांनी मराठी भाषेवर आक्रमण केले आहे. इंग्रजी व हिंदी भाषेच्या आक्रमणाने महाराष्ट्रातूनच मराठी भाषा हद्दपार होती की काय अशी शंका येऊ लागली आहे. अर्थात याला सर्वस्वी मराठी माणसेच जबाबदार आहे. मराठी माणसांच्या मनातच मराठीला गौण स्थान आहे आणि इंग्रजी भाषेला प्रथम स्थान आहे. इंग्रजी ही जागतिक भाषा आहे. इंग्रजीला ज्ञानभाषा म्हटले जाते म्हणून मराठीची उपेक्षा केली जात आहे. विशेषतः उच्चभ्रू मराठी कुटुंबात मराठीत बोलणे अप्रतिष्ठित समजले जाते तर इंग्रजी भाषेत बोलणे प्रतिष्ठेचे समजले जाते. मराठी ही मातृभाषा असूनही इंग्रजीतून बोलण्याचा अट्टहास धरला जातो. मराठी माणसे एकमेकांशी बोलताना मराठीत बोलायला कचरतात. मराठीपेक्षा इंग्रजी आणि हिंदीतून बोलणे प्रतिष्ठेचे समजतात. मराठी माणसेच आपल्या पाल्यांना मराठी माध्यमाच्या शाळेत दाखल करण्याऐवजी इंग्रजी




माध्यमांच्या शाळेत भरमसाठ फी भरुन दाखल करीत आहे. इंग्रजी भाषेचे अवास्तव स्तोम माजवल्याने मराठीमाध्यमांच्या शाळा बंद पडू लागल्या आहेत. मराठी साहित्य संमेलनाकडे मराठी माणसेच पाठ फिरवू लागल्याने मराठी पुस्तकांच्या विक्रीत घट होऊ लागली आहे. ग्रंथालयातील मराठी पुस्तके वर्षानुवर्षे जागेवरूनही हलतही नाही. महाराष्ट्रातच मराठी भाषेची उपेक्षा होऊ लागली आहे. मराठी भाषा जिवंत ठेवण्याचे काम मराठी, साहित्यिक व सरकारचे आहे असेच मराठी माणसाला वाटते. मराठी साहित्यिकांना, लेखकांना मराठी भाषेविषयी जन्मजात प्रेम आहेच. अभिमान आहे. मराठी भाषा गुणवत्तापूर्ण, दर्जेदार आणि आकर्षक होईल यासाठी ते आपल्या परीने प्रयत्न करीतही आहे. महाराष्ट्र सरकारही मराठी भाषा जिवंत रहावी यासाठी प्रयत्न करीत आहे. पण महाराष्ट्र सरकारचे हे प्रयत्न तोकडे आहेत असेच म्हणावे लागेल. मराठी भाषेवर इंग्रजी भाषेचे अतिक्रमण वाढत असताना ते रोखण्यासाठी सरकार ठोस प्रयत्न करीत असल्याचे दिसत नाही. इंग्रजी माध्यमांच्या शाळांना मागणी तसा पुरवठा या तत्वाने सरकार भराभर परवानगी देत आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळांना सढळ हाताने परवानगी देणारे सरकार नवीन मराठी शाळांना परवानगी देत नाही तसेच आहे त्या शाळांना अनुदान देताना हात आखडता घेते. सरकारी कार्यालयात मराठीचा वापर अनिवार्य असताना तिथेही मराठीची गळचेपी होते. अनेक सरकारी कार्यालयात आज देखील मराठीचा वापर नावापुरताच केला जातो. केंद्र सरकारच्या कार्यलयात तर मराठीचा वापर होतच नाही. सरकारी कार्यालयात मराठीचा वापर व्हावा असा आदेश असताना त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जाते. मराठी भाषा जगवण्यासाठी, वाचवण्यासाठी राज्य सरकारने खंबीर धोरण आखायला हवे. केवळ परिपत्रक काढून उपयोग नाही तर त्याची प्रभावी अंमलबजावणी होते का याचाही शोध सरकारने घ्यावा. राज्य सरकारच्या व्यवहारात मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करण्यासंबंधीच्या धोरणाची अंमलबजावणी करणे, सरकारच्या दैनंदिन कामकाजात मराठीचा जास्तीतजास्त वापर करणे, मराठी शाळांना जी उतरती कळा लागली आहे त्यासंदर्भात ठोस निर्णय घेऊन मराठी भाषेला उर्जितावस्था मिळवून देण्याचा प्रयत्न राज्य सरकारने करावा. मराठी ही अभिजात भाषा आहे. . अभिजात भाषेसाठी लागणारे सर्व निकष मराठी भाषा पूर्ण करत असूनही मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी झगडावे लागले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारने केंद्र सरकारकडे पाठ पुरवठा केला. सर्व राजकीय पक्षांच्या लोकप्रतिनिधींनी पक्षभेद विसरुन मराठीसाठी एकत्र येऊन मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा प्रयत्न केले साहित्यिक, लेखक यांनीही यासाठी सामूहिक प्रयत्न केलेत. या सर्वाचा परिपाक होऊन अखेर मराठी भाषेवर अभिजात भाषेची मोहोर उमटली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर महाराष्ट्रात उत्साहाचे भरते आले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर १४ कोटी मराठी माणसांची मान अभिमानाने उंचावली. मराठी माणसांनी गेली कित्येक वर्ष पाहिलेले स्वप्न अखेर साकार झाले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर मराठी माणसांची जबाबदारी आणखी वाढली आहे. मराठी भाषा टिकवण्यासाठी, वाचवण्यासाठी आता सर्वांना सामूहिक प्रयत्न होणे गरजेचे आहे. मराठी भाषा टिकवण्यासाठी, वाचवण्यासाठी सरकारी तसेच सामाजिक पातळीवर प्रयत्न व्हायला हवेत. मराठी भाषेला सुगीचे दिवस आणण्याची जबाबदारी सर्वांचीच आहे. सर्वसामान्य मराठी माणसांपासून सरकारपर्यंत सर्वांनीच मराठीच्या उत्कर्षासाठी आत्मचिंतन करायला हवे.

**मराठी भाषा दिनाच्या समस्त मराठी जनांना हार्दिक शुभेच्छा!!!**

## अभिजात दर्जा ...

मराठी अभिजातभाषा
रुंजे अपेक्षा मनामनात
मराठी जयघोष उच्चतो
प्रतिध्वनी कानाकानात

पाचवी पुजते हेटाळणी
केवढी कष्टली उन्हांत
हक्क असूनि सिंहासनी
विजनवास रानां वनात

स्वप्नांचे जलाशय हसले
रे सारस्वतांच्या नयनात
साफल्य आनंद आगळा
समिधा सुशुध्द हवनात

हवा का अभिजातदर्जा
संशयी वैफल्य जनात
थिटे पडले ते टिकाकार
अल्प भर घाली ज्ञानांत

निष्क्रीयता सजूनबसते
मुढांचासंतोष अज्ञानात
माय मराठी जगत्जननी
मखरीबसली सन्मानात

सळाळला म–हाठी ध्वज
शिर उंचवा अभिमानात
विपुल ते साहित्यसमृध्द
गौरवले जावे गरिमानात

प्राचीनत्व सहजते सिध्द
गंधदर्वळकुलाभिमानात
कसोटीवर उतरले सुवर्ण
महानत्व अनुभूयमानात

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वृत्त, अचूक बातमी

# 'माय मराठी'ला समृद्ध करूया !

दरवर्षी २७ फेब्रुवारीला कवी वि.वा. शिरवाडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने मराठी राजभाषा दिन राज्यात सर्वत्र उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी आणि या दिवसाच्या निमित्ताने सर्वत्र मराठीचा बोलबाला असतो, मराठीत स्वाक्षरी करण्याच्या मोहीमा राबवल्या जातात, मराठी बोलण्याचा अट्टाहास केला जातो, मराठी पाट्यांचा प्रश्न ऐरणीवर येतो, मराठीतून शुभेच्छा देण्याचे आवाहन केले जाते. मात्र हा दिवस सरला की पुढे वर्षभर कोणी मराठीविषयी काहीच बोलताना दिसत नाही, त्यामुळे मराठी भाषाभिमानही अन्य 'डेज'प्रमाणे केवळ एक दिवसापुरता सीमित राहिला आहे. मराठी भाषा बोलणारे देशभरात सुमारे नऊ कोटी तर भारताबाहेर अडीच कोटीहुन अधिक लोक आहेत. भारतात चौथ्या क्रमांकाची तर जगात दहाव्या क्रमांकाची भाषा म्हणून मराठीला गौरविले जाते.

आज मराठी भाषेला महाराष्ट्रातच घरघर लागली आहे याचे कारण आपलाच व्यवहारातील मराठीचा वापर कमी होत चालला आहे. एकीकडे मराठी शाळा बंद पडू लागल्या आहेत, तर दुसरीकडे इंग्रजी माध्यमांच्या आणि कॉन्व्हेंट शाळांना अच्छे दिन आले आहेत. पाल्यांवर लहानपणापासून इंग्रजीची सक्ती करून आपण केवळ मराठीला डावलतो आहोत असे नव्हे, तर पाल्यांचा बौद्धिक विकासही खुंटत आहोत हे आपल्या केव्हा लक्षात येणार ? जेव्हा व्यवहाराची आणि शिक्षणाची भाषा एक असते तेव्हाच त्या भाषेचे वैभव आणि त्यातील शब्दसंपदा, खऱ्या अर्थाने आपल्या लक्षात येऊन ती भाषा आपल्या भाव भावना व्यक्त करण्याचे, संवेदना जाणून घेण्याचे, विचार व्यक्त करण्याचे साधन बनते. आजमितीला चारचौघांत इंग्रजी भाषेत संभाषण साधने प्रतिष्ठेचे समजले जाते. प्रतिष्ठेची ही व्याख्या आपणच तयार केली आहे ना ? आपल्याला फारसे इंग्रजी येत नाही म्हणून महाराष्ट्रात मराठी माणूस न्यूनगंड बाळगू लागला आहे. इंग्रजी भाषेत अस्खलित बोलण्यास शिकवणाऱ्या शिकवण्या जागोजागी तयार होऊ लागल्या आहेत त्यामध्ये मोठ्या संख्येने मराठी तरुणच दिसून येतात. ही गरज कोणी निर्माण केली ? शाळांमध्ये मुलांना भरती करण्याआधी त्यांच्या पालकांना इंग्रजी येते का हे पाहण्यासाठी प्रथम पालकांच्या मुलाखती घेतल्या जातात. अनेक मोठ्या कंपन्यांमध्ये नव्याने नोकरीस लागणाऱ्या मराठी माणसाला आज इंग्रजी मुलाखतीला सामोरे जावे लागते. साधे सिम कार्ड घ्यायचे झाले, तरी त्याचा अर्ज इंग्रजीत भरावा लागतो. महाराष्ट्रात कुठल्याही क्षेत्रात आणि कोणत्याही संदर्भात निवेदन द्यायचे असेल किंवा अर्ज भरायचे असतील, तर त्यासाठी प्रथम पर्याय मराठीचाच असायला हवा ही सक्ती महाराष्ट्रात का केली जात नाही. आज मॉल किंवा सुपर मार्केट या ठिकाणी ग्राहकांशी नीट संवाद साधता यावा यासाठी हिंदी आणि इंग्रजी चांगले येणाऱ्या तरुण तरुणींना नोकरीवर ठेवले जाते त्यासाठी त्यांना अधिक वेतन दिले जाते त्यामुळे अशा ठिकाणी मराठी मुलांना नोकऱ्या मिळत नाहीत. ही स्थिती कोणी निर्माण केली ? महाराष्ट्रात राहायचे तर मराठी यायलाच पाहिजे. नीट बोलता नाही आले, तरी मराठी समजायला तर हवेच. आपल्या मातृभाषेला आलेल्या या अवकळेला आपण मराठी भाषिकच कारणीभूत आहोत. आपल्या मातृभाषेविषयी आपली अशीच उदासीनता राहिली, तर पुढच्या पिढीवर मातृभाषेचे संस्कार कसे होतील ? आज मराठी शाळा बंद पडू लागल्या आहेत. घरोघरी आई, बाबा, काका, मामा या गोड नात्यांची जागा आता मम्मा, डॅडा, आंटी, अंकलने घेतली आहे. मुलांना असे म्हणण्यास पालकांकडूनच प्रवृत्त केले जात आहे. मराठी सणांचे महत्व कमी होऊन फेब्रुवारीतील 'डेज' उत्साहाने साजरे होऊ लागले आहेत, नाताळात घरोघरी ख्रिसमस ट्री येऊ लागले आहेत, मराठी घरात नववर्ष गुढीपाड्व्यापेक्षा एक जानेवारीला अधिक उत्साहाने साजरे होऊ लागले आहे. घरोघरी वाढदिवस हिंदू कालगणनेनुसार तिथींना नव्हे तर इंग्रजी तारखांना साजरे होऊ लागले आहेत. मराठी भाषेला जपायचे असले तर सर्वप्रथम मराठी संस्कृती आणि मराठी अस्मिता जपणे अधिक महत्वाचे आहे आणि त्याची सुरुवात प्रत्येक मराठी माणसाने स्वतःपासून आणि आपल्या कुटुंबापासून करायला हवी. 'मराठी बोला, मराठी जगा आणि मराठी वागा' या नीतीचा अवलंब राज्यात सर्वच ठिकाणी केला गेला तरच येणाऱ्या काळात मराठी भाषेला तिचे पुनर्वैभव प्राप्त होईल.

**सौ. मोक्षदा घाणेकर**
**काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## श्री. ढोकेश्वर महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, पारनेर (अहिल्यानगर) :** समाजात हार घालणारे कमी तर प्रहार करणारे अधिक असतात. यशाचा एक हार गळ्यात घालून घेण्यासाठी हजारो प्रहार झेलावे लागतात,याची जाणीव महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी ठेवली पाहिजे. विद्यार्थ्यांनी वेळेचे नियोजन करणे गरजेचे आहे. शैक्षणिक वर्षात कमी गुण मिळाले तरी नाराज होऊ नका विविध स्पर्धांमध्ये पहिले येणे पुरेसे नाही,आशा विद्यार्थ्यांनी कलागुण ओळखून त्यातून आपण कोठे आहोत हे तपासणे गरजेचे आहे. समुद्राच्या तळातून मोती काढण्याचे धाडस ठेवा, यश निश्चित मिळेल, असे प्रतिपादन जेष्ठ चित्रपट गीतकार, अभिनेते आणि लेखक बाबासाहेब सौदागर यांनी श्री ढोकेश्वर महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात केले.

याप्रसंगी श्रीरामपूर येथील प्रसिद्ध गीतकार, आणि लेखक, निसर्गकवी बाबासाहेब सौदागर,अभिनेत्या कविता सौदागर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे जेष्ठ विश्वस्त सीताराम खिलारी सर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. लक्ष्मण कोठावळे, सामाजिक कार्यकर्ते श्रावण गायकवाड व्यासपीठावर उपस्थित होते.

सौदागर पुढे म्हणाले की, गद्य,पद्य व मद्य यातील अनेकांना मद्याची ओढ असते, मात्र गद्य आणि पद्य यांची ओढ निर्माण झाल्यास साहित्यिक, गीतकार निर्माण होतात. मराठी बरोबरच अन्य भाषांचा आदर करा. संस्कारांमुळे गुण विकसित होतात. त्यामुळे चांगले संस्कार अंगिकारले पाहिजे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी कठीण प्रसंगांचा सामना न डगमगता केला पाहिजे, विद्यार्थ्यांनी स्वतः यशस्वी झाल्यानंतर समाजात मायेची शाल पांघरा. यावेळी बाबासाहेब सौदागर यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत निसर्गाच्या कविता सादर केल्या. तसेच कवितेच्या माध्यमातून गाण्याच्या निर्मिती संदर्भात अनुभव कथन केले.

यावेळी प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर, उपप्राचार्य प्रा. विरेंद्र धनशेट्टी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. समारंभात शैक्षणिक, सांस्कृतिक व खेळ प्रकारात आपला ठसा उमटवणाऱ्या गुणवंत प्राध्यापक व विद्यार्थ्यांना सिताराम खिलारी यांच्या हस्ते गौरव व अभिनंदन करून महाविद्यालयाचे व संस्थेचे नाव उज्ज्वल करावे असे आवाहन केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे कार्याध्यक्ष प्रा. लक्ष्मण कोठावळे यांनी महाविद्यालयात वर्षभर विविध विभागात राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे अहवाल वाचन केले. सुत्रसंचलन डॉ. जिजाभाऊ घुले व प्रा. रेश्मा सोनवणे यांनी केले तर आभार उपप्राचार्य प्रा. विरेंद्र धनशेट्टी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कला शाखा प्रमुख प्रा. विजय सुरोशी, प्रा.नामदेव वाल्हेकर, प्रा. डॉ. सुदामा वीर, प्रा. शांता गडगे, सावकार काकडे यांनी प्रयत्न केले.

# माथेरानमध्ये ई रिक्षा सेवाबाबत आता अंतिम निर्णय घ्या

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२६, माथेरान :** माथेरानमध्ये ई-रिक्षा सेवा सर्व हातरिक्षा चालकांना मिळावी या मागणीसाठी श्रमिक ई-रिक्षा संघटनेने यापूर्वी दोन वेळा बंद पुकारला होता. त्या वेळी प्रशासनाने बैठका घेऊन संघटनेला आश्वासन दिले होते. दरम्यान, मागील चार दिवस ई-रिक्षा सेवा पूर्णपणे बंद असल्याने नागरिक, शालेय विद्यार्थी, वयोवृद्ध तसेच पर्यटक यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. आजच्या घडीला ई-रिक्षा ही माथेरानकरांच्या दैनंदिन जीवनातील एक अविभाज्य घटक बनली असून तिच्या अनुपस्थितीची तीव्र जाणीव सर्वांना झाली.

सध्या ई-रिक्षा सेवेची मर्यादा केवळ पांडे प्ले ग्राउंड आणि मेरे लाईन रोडपुरती ठेवण्यात आल्याने शिवाजी रोड परिसरातील स्थायिक नागरिक तसेच रब्बी विभागातील रहिवाशांना ई-रिक्षाचा लाभ घेण्यासाठी पुढे चालत जावे लागते. यामुळे विशेषतः



ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांना त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार आहे.

पायलट प्रोजेक्टच्या कालावधीत या भागातील नागरिकांनी ई-रिक्षा सेवा वाढविण्यासाठी अनेक वेळा अर्ज सादर केले व बैठका घेतल्या. घरपोच सेवा नसली तरी किमान मध्यवर्ती ठिकाणी ई-रिक्षा उपलब्ध व्हावी आणि फोन केल्यावर काही वेळात स्टँडपर्यंत रिक्षा यावी, ही शिवाजी रोड, इंदिरा गांधी नगर व रब्बी विभागातील नागरिकांची प्रमुख मागणी आहे. मागील चार दिवसांच्या संपानंतर प्रशासनाने पुन्हा बैठक घेऊन संघटनेला आश्वासन दिले आहे. मात्र, नागरिकांच्या मते रस्ते, रिक्षांची संख्या, तसेच स्टँडच्या मर्यादांबाबत एकदाच अंतिम निर्णय घेणे गरजेचे आहे. वारंवार होणारे संप आणि बंदमुळे माथेरानची प्रतिमा मलिन होत असून गावात गैरसमज आणि अंतर्गत तणाव वाढत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

रब्बी विभाग हा बंगलेधारकांची वस्ती असल्याने येथील घरे दूरवर पसरलेली आहेत. त्यामुळे या भागातील नागरिकांनी किमान नैमिषारण्य बंगला नाक्यापर्यंत ई-रिक्षा सेवा सुरू करावी, अशी ठोस मागणी केली आहे.

मॉनिटरिंग कमिटीच्या बैठकीत सर्व संबंधित घटकांचा विचार करून कायमस्वरूपी निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते दत्ता सनगरे यांनी केली आहे. आता प्रशासन व कमिटी कोणता निर्णय घेते, याकडे सर्व माथेरानकरांचे लक्ष लागले आहे.

# जुईनगरमध्ये लोकप्रतिनिधींचा सुळसुळाट

## पण समस्यांचे डोंगर कायम; नगरसेवकांच्या वादात जनता वाऱ्यावर!

**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.२६, जुईनगर (नवी मुंबई) :** महापालिका निवडणुकीनंतर जुईनगरच्या प्रभाग क्रमांक २२ मध्ये विचित्र पेच निर्माण झाला आहे. एकाच प्रभागात चार वेगवेगळ्या पक्षांचे उमेदवार निवडून आल्याने 'क्रेडीट वॉर' सुरू झाले असून, याचा फटका सामान्य नागरिकांना बसत आहे. गेल्या दोन दिवसांपासून प्रभागातील पथदिवे बंद असतानाही, कोणीही जबाबदारी घ्यायला तयार नसल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.

**नेमका गोंधळ काय?**

पूर्वी समस्या उद्भवल्यास माजी नगरसेविका तनुजा मढवी यांच्या माध्यमातून तातडीने निवारण व्हायचे. मात्र, आता चार नगरसेवक असल्याने काम कोणी करायचे? यावरून टोलवाटोलवी सुरू आहे. पथदिव्यांसारख्या मूलभूत सुविधेसाठीही रहिवाशांना दोन-दोन दिवस अंधारात राहावे लागत आहे.

**बाह्य हस्तक्षेप आणि दादागिरी :**

सर्वात गंभीर बाब म्हणजे, प्रभाग १८ मधील काही नगरसेवकांचे हस्तक प्रभाग २२ मधील विकासकामांत हस्तक्षेप करत असल्याच्या तक्रारी येत आहेत. उपमहापौर आमचेच आहेत अशी भीती दाखवून जुन्या ठेकेदारांना धमकावण्याचे प्रकारही घडत आहेत. ज्यांचा या प्रभागाशी कायदेशीर संबंध नाही, त्यांची ढवळाढवळ जुईनगरच्या विकासाला खिळ घालत आहे.

**प्रशासनाची भूमिका काय?**

कोणत्या नगरसेवकाने कोणता भाग पाहायचा आणि फाईल कोणी मंजूर करायची, याबाबत प्रशासनाने स्पष्ट सीमांकन करणे गरजेचे आहे. अन्यथा, हे 'मदमस्त' लोकप्रतिनिधी एकमेकांच्या कामात अडथळे आणून नागरिकांचे जिणे हराम करतील, अशी भीती व्यक्त होत आहे.

# अतिरिक्त ग्राहक आयोगाच्या अध्यक्षाला हटवा - श्रीराम सातपुते

## अनेक तक्रारी प्रलंबित असल्याने सरकारकडे मागणी

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२६, नागपूर :** नागपूर जिल्हा अतिरिक्त ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष यांच्यात निर्णय घेण्याची क्षमता नसल्यामुळे गेल्या चार-पाच वर्षांपासून अनेक तक्रारी प्रलंबित आहे. तक्रारकर्त्या ग्राहकांना वारंवार तारखा देऊन मानसिक त्रास देत आहे. त्यामुळे त्यांना नागपूर येथून हटवण्याची मागणी ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे नागपूर जिल्हा ग्रामीण संघटक श्रीराम सातपुते यांनी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अप्पर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर आणि राज्याचे मुख्य ग्राहक आयोगाचे अध्यक्ष यांच्याकडे एका पत्राद्वारे केली आहे.

नागपूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात औद्योगीकरण झाल्याने फसवणुकीच्या प्रमाणात ही मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे ग्राहक आयोगात कार्यक्षम अध्यक्ष आणि सदस्य असणे अत्यंत आवश्यक आहे. ग्राहक संरक्षण कायद्यानुसार तक्रारकर्ता ग्राहकाला ९० दिवसात न्याय मिळणे अपेक्षित आहे. परंतु अतिरिक्त ग्राहक आयोगात तीन ते चार महिन्याच्या पुढच्या तारखावर तारखा दिल्याने ग्राहकाला मानसिक त्रास होत आहे. असे सरकारला पाठविलेल्या पत्रात नमूद केले आहे.

ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे श्रीराम सातपुते यांनी नागपूर जिल्हा अतिरिक्त ग्राहक तक्रार निवारण आयोगात स्वतः (इनपर्सन) ऑगस्ट २०२२ मध्ये तक्रार क्रमांक CC/289/2022 दाखल केली होती. विरुद्ध पक्षाला नोटीस मिळाल्यानंतर उत्तर दिले. तक्रारकर्त्या ग्राहकांनी प्रतिउत्तर दाखल केल्यानंतर विरुद्धपक्ष सतत दीड वर्ष गैरहजर राहिला. विरुद्धपक्ष गैरहजर असल्याने ग्राहक आयोगाला निर्णय घेण्याची विनंती केल्यानंतरही निर्णय घेतला नाही. ग्राहक संरक्षण कायद्यानुसार तीन किंवा चार तारखेवर विरुद्धपक्ष गैरहजर राहिल्यास त्या तक्रारीचा निकाल द्यावा लागतो. असे असतानाही ग्राहक आयोगाचे अध्यक्ष निर्णय घेत नाही. अखेर तीन वर्षांनी अंतिम आदेश बोर्डावर लिहिल्यानंतर अनेक वेळा पुढच्या तारखा देत राहिले. असेही पत्रात नमूद आहे.

# ठाणे रेल्वे स्थानकाकडील जीवघेणी गर्दीच ठरतेय विविध अपघातांचे कारण

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२६, ठाणे :** मुंबईची जीवनवाहिनी मानली जाणारी उपनगरी लोकल सेवा वाढत्या गर्दीमुळे प्रवाशांसाठी धोकादायक बनत असल्याचे चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार मध्य रेल्वे मार्गावर वर्षाकाठी सुमारे २१८० अपघाती मृत्यू होत आहेत. केवळ ठाणे स्टेशन परिसरातच वर्षभरात २८७ अपघातांची नोंद होत असून, दररोज सरासरी सात जणांना जीव गमवावा लागत असल्याचे वास्तव चिंताजनक आहे.

या मृत्यूंच्या मागे प्रमुख कारण म्हणून प्रचंड गर्दीकडे बोट दाखवले जात आहे. वाढती लोकसंख्या, अपुरी पायाभूत सुविधा आणि वाढलेला प्रवासी ताण यामुळे लोकलमधील प्रवास दिवसेंदिवस कोंडीत अडकत चालला आहे.कामानिमित्त, शिक्षणासाठी आणि अन्य कारणांसाठी मुंबईकडे दररोज लाखो प्रवासी धाव घेतात, मात्र ट्रेन वेळेवर न येणे, वेळापत्रकात सतत बदल, अचानक गाड्या रद्द होणे आणि डब्यांमधील असलेल्या गर्दी यामुळे प्रवाशांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो.

कळवा मुंब्रा दरम्यानच्या अपघाताच्या आठवणी ताज्या असतानाच काही दिवसांपूर्वी १२वीच्या परीक्षेला जात असताना एका विद्यार्थ्यांचा रेल्वेमधून पडून कळवा मुंब्रा दरम्यान झालेला दुर्दैवी मृत्यू हा गर्दीच्याच भीषणतेचा आणखी एक



वेदनादायक दाखला ठरला. या घटनेनंतर रेल्वे सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. ठाणे आणि मुंबईकडे धावणाऱ्या लोकलमध्ये वाढती गर्दी, प्लॅटफॉर्मवरील गोंधळ आणि अपुरी सुरक्षा व्यवस्था यामुळे अपघातांचे प्रमाण वाढत असल्याची तक्रार प्रवाशांकडून आणि प्रवासी संघटनांकडून वारंवार केली जात आहे.ठाण्याच्या पुढचे स्टेशन कळवाआहे.कर्जत,कल्याण आणि कसराकडून खचाखच भरून येणाऱ्या ट्रेनमध्ये कळवेकरांना तर शिरायला पण मिळत नाही. शेवटी नाईलाजास्तव कालव्यातील बहुसंख्य प्रवासी सकाळच्या गर्दीच्या वेळी कळवा कारशेड मधून मुंबईकडे निघणाऱ्या ट्रेनमधे स्वतःचा जीव धोक्यात घा चालत्या लोकल मध्ये वर चढतात. यामध्ये प्रामुख्याने नोकरदार, महिला, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांचा समावेश असतो. पण आता अनधिकृत प्रवासी वाहतुकीचे कारण सांगून रेल्वे प्रशासन कळवेकरांचीं ही सुविधा देखील बंद करणार आहे. परंतु कळवा मुंब्रा प्रवासी संघर्ष समितीने या निर्णयाविरोधात दंड थोपटले असून कळव्यातील प्रवाशांसाठी अगोदर होम प्लॅटफॉर्म निर्माण केल्याशिवाय कारशेड सुविधा बंद करू नये अशी रीतसर मागणी तब्बल पाच हजार प्रवाशांच्या सहिनीशी केली आहे.तसेच या बाबतचे सविस्तर निवेदन कळव्यातील आमदार,नगरसेवक तथा खासदार श्रीकांत शिंदे यांना देखील प्रत्यक्ष भेटून दिले आहे.

गर्दी नियंत्रणासाठी ठोस आणि दीर्घकालीन उपाययोजना होत नसल्याने प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. अनेक वेळा प्लॅटफॉर्मवर उभे राहण्यासही जागा नसल्याचे दृश्य पाहायला मिळते, उपनगरी रेल्वे सेवा ही शहराच्या गतीची धुरीण असली तरी आज तीच सेवा प्रवाशांसाठी त्रासदायक आणि जीवघेणी ठरत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

मध्य रेल्वे मार्गावर वर्षाकाठी सुमारे २१८० अपघाती मृत्यू होत आहेत. केवळ ठाणे स्टेशन परिसरातच वर्षभरात २८७ अपघातांची नोंद होत असल्याची माहिती आम्हाला मिळाली असून, एसी ट्रेनची गरज मान्य असली तरी सलग एसी गाड्या चालविण्यापेक्षा दोन एसी ट्रेन दरम्यान दोन ते तीन साध्या लोकल सोडणे आवश्यक आहे. त्यामुळे गर्दीचा निचरा होण्यास मदत होईल. मुंब्रा स्टेशनवर कौसा आणि शिळ परिसरातून मोठ्या प्रमाणावर प्रवासी येत असल्याने तेथे 'होम प्लॅटफॉर्म'ची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, आगामी काळातील शैक्षणिक परीक्षांची वेळ गर्दीच्या शिखर काळात ठेवू नये, यासाठी शिक्षण खात्याला विनंती करणार आहे.

# जिल्हा संघटनांना स्वतंत्र अधिकार व संरक्षण देण्याची मागणी

## एक जिल्हा - एक राज्य - एक राष्ट्रीय महासंघ धोरणाची आवश्यकता

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.२६, मुंबई :** क्रीडा क्षेत्रातील पायाभूत रचना ही जिल्हा स्तरावर उभी राहते.खेळाडूंची निवड,प्रशिक्षण, स्पर्धा आयोजन आणि खेळाचा प्रचार-प्रसार हे सर्व काम मुख्यत्वे जिल्हा क्रीडा संघटनांच्या माध्यमातूनच पार पडते. मात्र,राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील वादांमुळे जिल्हा संघटनांना अन्याय सहन करावा लागत असल्याचे मत आहे. क्रीडा संघटक व्यंकटेश्वरराव करारा यांनी केला आहे.



करारा यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अनेक ठिकाणी एखादी जिल्हा क्रीडा संघटना राज्य संघटनेची अधिकृत संलग्नता घेऊन अनेक वर्षे कार्यरत असते, खेळाचा विकास करते, जिल्हा क्रीडा परिषदेकडून मान्यता प्राप्त असते; तरीही राज्य स्तरावरील वाद किंवा समांतर राज्य संघटनांच्या हस्तक्षेपामुळे त्याच जिल्ह्यात समांतर संघटना उभी करण्याचे प्रयत्न केले जातात. यामुळे मूळ कार्यरत संघटनेचे अस्तित्व धोक्यात येते.

राज्य संघटनेवर रव-हेल समिती स्थापन झाली की जिल्हा संघटना आपोआप रद्द होते,असे सांगितले जाते.हे चुकीचे आहे.जिल्हा संघटनेचा राज्य संघटनेच्या अंतर्गत वादाशी काय संबंध? जिल्हा स्तरावर काम करणाऱ्या संघटनांना डावलून दुसरी संघटना स्थापन करणे हे खेळाच्या हिताचे नाही,असे करारा यांनी स्पष्ट केले. त्यांच्या मते, खेळाडूंची निवड जिल्हा स्तरावरूनच राज्य संघटनेकडे पाठवली जाते. जिल्हा संघटनांच्या संलग्न यादीवरूनच राज्य संघटनांना शासन व राष्ट्रीय महासंघाकडून ओळख मिळते. अशा परिस्थितीत जिल्हा संघटनांना स्वतंत्र अधिकार आणि संरक्षण देणे आवश्यक आहे.

**करारा यांनी पुढील मागण्या मांडल्या आहेत :-**

संबंधित जिल्ह्यातील संघटना कार्यरत आहे की नाही, याचा अहवाल स्थानिक जिल्हा क्रीडाधिकारी यांच्या माध्यमातून घ्यावा.

राज्य स्तरावरील वाद निकाली निघेपर्यंत मूळ संलग्न जिल्हा संघटनेशीच अधिकृत पत्रव्यवहार करावा. जिल्हा स्तरावर रव-हेल समिती स्थापन करणे किंवा समांतर संघटना उभी करणे टाळावे.

खेळाच्या विकासासाठी अधिकारांचा उपयोग व्हावा; संघटनात्मक संघर्षासाठी नव्हे.

खेळाचा विकास थांबवून संघटनात्मक राजकारण करणे योग्य नाही. पद आणि अधिकार हे खेळ वाढवण्यासाठी असतात, संघटना पाडण्यासाठी नाहीत, असेही त्यांनी नमूद केले.

एक जिल्हा-एक राज्य-एक राष्ट्रीय महासंघ हे धोरण राबविले गेले,तर संघटनांमधील गोंधळ आणि वाद कमी होतील,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. फक्त लोगो बदलून किंवा फोटो बदलून संघटना होत नाही.एक भारत-एक संघ अशीच रचना असावी,असे मतही त्यांनी मांडले.

क्रीडा क्षेत्रातील स्थैर्य आणि खेळाडूंच्या हितासाठी जिल्हा पातळीवरील संघटनांना सक्षम व स्वायत्त बनविण्याची गरज असल्याचे करारा यांनी अधोरेखित केले आहे.

### श्री संत नामदेव महाराज यांचे नागपूर येथे ऐतिहासिक महासंमेलन संपन्न

# नितीन गडकरी यांना 'श्री संत नामदेव महाराज जागतिक पुरस्कार' प्रदान



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२६, विंचूर (नाशिक) :** श्री संत नामदेव महाराज यांचे नागपूर मध्ये महासंमेलन संपन्न झाले. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना त्यांच्या सामाजिक कार्याची आणि संत नामदेव महाराजांचा वारसा पुढे नेल्याची दखल घेत 'संत नामदेव महाराज जागतिक पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. नागपूर येथील रेशीमबाग मैदानावर आयोजित 'राष्ट्रीय एकात्मता जागतिक परिषदे' दरम्यान हा मानाचा सोहळा पार पडला.

या सोहळ्याला संत नामदेव महाराजांचे १७ वे वंशज विठ्ठल महाराज, देवनाथ मठाचे प्रमुख जितेंद्रनाथ महाराज, सतपाल महाराज, प्रसिद्ध अभिनेते गोविंद नामदेव आणि मुख्य संयोजक ईश्वर धिरडे यांची प्रमुख उपस्थिती होती. संपूर्ण भारतातून आलेले वारकरी संप्रदाय आणि शिंपी समाज बांधवांच्या उपस्थितीने रेशीमबाग मैदान भक्तिमय झाले होते.

**गडकरी पुरस्कार स्वीकारल्यानंतर बोलताना नितीन गडकरी भावूक झाले. ते म्हणाले, संत नामदेव महाराजांनी समाजातील विषमता दूर करून एकतेचा मार्ग दाखवला. त्यांच्या विचारांची व्याप्ती इतकी मोठी होती की, त्यांच्या शिकवणीचा समावेश शीख धर्माच्या पवित्र 'गुरु ग्रंथ साहिब' मध्ये करण्यात आला आहे. पंजाबमधील घुमान आणि महाराष्ट्रातील नरसी या दोन भूमींना जोडण्याचे भाग्य मला मिळाले, हे मी माझे संचित मानतो. विशेष म्हणजे, संत नामदेव महाराजांचे जन्मस्थान असलेल्या नरसी (जि. हिंगोली) गावापासून हिंगोलीपर्यंत रस्ता बांधण्याची संधी मिळाली, हा आपल्यासाठी वैयक्तिक आनंदाचा क्षण असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.**

**गडकरींनी पंजाबमधील 'घुमान' येथील मराठी साहित्य संमेलनाच्या आठवणींना उजाळा दिला. 'नरसी' ते 'हिंगोली' रस्ते विकासाचा संकल्प संतांच्या चरणी अर्पण.**

या जागतिक संमेलनासाठी नाशिक येथूनही शिंपी समाजाचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात प्रवीण पवार, अरुण नेवासकर, दत्ता वावधाने, अतुल मानकर, राजेंद्र करमासे, योगेश वारे, वृषाली तुपसाखरे यांच्यासह अन्य मान्यवरांचा समावेश होता.

## सावित्रीबाई फुले शाळेतील ३३ विद्यार्थी एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२६, चंद्रपूर :** महानगरपालिकेच्या पीएम श्री सावित्रीबाई फुले शाळेतील ३३ विद्यार्थी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती एनएमएमएस परीक्षेत उत्तीर्ण झाले असून शहरातील एका शाळेतील सर्वात अधिक संख्येने या परीक्षेत उत्तीर्ण होण्याचा मान मनपा शाळेने मिळविला आहे.

या परीक्षेमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल वार्षिक उत्पन्न ३.५ लाखांपेक्षा कमी आणि सरकारी/ अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना ९ वी ते १२ वी पर्यंत प्रतिवर्ष १२,००० रुपये शिष्यवृत्ती मिळते. या यशामागे शाळेचे मुख्याध्यापक शिवलाल इरपाते, शिक्षक जोगेश्वर मोहोरे, सोनाली कासुलकर तसेच वर्गशिक्षक मंगेश अंबादे यांचे नियोजनबध्द मार्गदर्शन, परिश्रम आणि सातत्यपूर्ण प्रयत्न मोलाचे ठरले आहेत.



**➤ मनपा शाळांमधील विद्यार्थी गुणवत्तेच्या बाबतीत कोणत्याही शाळांपेक्षा कमी नाहीत, हे या यशातून स्पष्ट झाले आहे. भविष्यात अशा परीक्षांमध्ये अधिक विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी आवश्यक सुविधा व मार्गदर्शन अधिक चांगल्या रितीने मिळेल याकडे लक्ष दिल्या जाईल. – आयुक्त अकुनूरी नरेश**

## पेण ओढांगी येथे भजन सम्राट श्री दत्तात्रय बुवा पाटील प्रवेशद्वाराचे भुमिपूजन



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.२६, पेण (रायगड) :** पेण तालुक्यातील ओढांगी येथे नुकतेच भक्तांचे गुरुवर्य भजन सम्राट श्री.दत्तात्रय बुवा पाटील यांच्या नावाचा प्रवेशद्वाराचे भूमिपूजन करण्यात आले आहे. गेल्या काही वर्षांपासून येथील गावासह परिसरात भजन, कीर्तन मोठ्या प्रमाणात होत असून असंख्य वारकरी संप्रदायातील मंडळी या कार्यक्रमासाठी येत असतात त्यामुळे अशा सामाजिक कार्यात त्यांचा मोठा हातभार असल्याने भजन सम्राट दत्तात्रेय बुवा पाटील ओढांगीकर यांचे प्रवेशद्वार येथील शिष्यांच्या माध्यमातून करण्यात येत आहे. ओढांगी सारख्या गावांमध्ये त्यांच्या सांप्रदायाच्या आठवणींना वारंवार उजाळा मिळावा यासाठी तिथे त्यांच्या नावाचा प्रवेशद्वार उभारण्यात येत असल्याने याचे भूमिपूजन १९ फेब्रुवारी रोजी करण्यात आला. यावेळी वाशी ग्रुप ग्रामपंचायत सरपंच, सदस्य तसेच खारभुमी निवृत्त अधिकारी त्यांचे शिष्य यांच्यासह वाशी, ओढांगी पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.सदर प्रवेशद्वारासाठी येणारा खर्च सर्व शिष्यगणांकडून करण्यात येत असून सदर प्रवेशद्वारासाठी येणारा खर्च सर्व भक्तांकडून करण्यात येणार आहे.याचे काम दिपक म्हात्रे स्ट्रक्चरल इंजिनीयर यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली अरविंद पाटील काश्मिरे यांच्यामार्फत करण्यात येणार आहे.

## थोडक्यात

### दादर स्टेशनमधील चालता फिरता इंडिकेटर

#### नरेंद्र पाटलांची प्रवाशांसाठी निस्वार्थी सेवा



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२६, दादर (मुंबई) :** मुंबईतील दादर रेल्वे स्थानकावर नरेंद्र पाटील हे चालते-फिरते इंडिकेटर म्हणून ओळखले जातात. रेल्वे प्रशासनाने नव्हे, तर स्वयंसेवक म्हणून ते प्रवाशांना स्थानक, प्लॅटफॉर्म आणि लोकलच्या वेळापत्रका विषयी मोफत मार्गदर्शन करतात. फुल मार्केटसमोरील नवीन रेल्वे पुलावर, जिथे निर्देशकांचा अभाव आहे, तिथे ते गोंधळलेल्या प्रवाशांसाठी मदतनीस ठरले आहेत. दरम्यान गेल्या चार वर्षांपासून पाटील हे दररोज सकाळी ९:३० ते ११:३० या वेळेत ही सेवा देतात. त्यांचा उद्देश स्पष्ट आहे. नवीन पूल बांधल्यानंतर प्रवाशांना, विशेषतः परीक्षेसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना होणारा त्रास कमी व्हावा.विशेष बाब म्हणजे स्वतःची खाजगी नोकरी असूनही, ते बारा वाजता कामावर जाण्यापूर्वी दोन तास प्रवाशांच्या सेवेत असतात. त्यांची ही निस्वार्थ सेवा अनेक प्रवाशांसाठी मात्र मोठा आधार ठरत आहे.म्हणूनच त्यांना चालता बोलता इंडिकेटर म्हणून अभिमानाने संबोधले जात आहे.

### महा-रेरा अंतर्गत थकबाकी वसुलीसाठी कडक कारवाई - मंत्री शंभूराज देसाई

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२६, मुंबई :** महा-रेरा अंतर्गत थकीत रकमेच्या वसुलीसाठी राज्य शासनाने कडक भूमिका घेतली असून वसुली ३४ टक्क्यांपेक्षा अधिक करणार असल्याची माहिती मंत्री शंभूराज देसाई यांनी विधानसभेत दिली. महाराष्ट्र स्थावर संपदा प्राधिकरणाने घर खरेदीदारांच्या नुकसान भरपाईपोटी जारी केलेल्या आदेशांची अंमलबजावणी होत नसल्याबाबत सदस्य अतुल भातखळकर यांनी प्रश्न विचारला होता.

मंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, घर खरेदीदारांच्या हितासाठी महा-रेरा ची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश केंद्र सरकारकडून देण्यात आले आहेत. महा-रेरा कायदा हा ग्राहकांच्या संरक्षणासाठी केंद्र सरकारने आणला असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांसोबत आढावा बैठक घेऊन वसुलीबाबत कठोर धोरण राबविण्याच्या सूचना दिल्या होत्या. राज्य शासनाने वसुली प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना विशेष निर्देश दिले आहेत. बिल्डरांच्या मालमत्तेचा शोध घेण्यासाठी भूमी अभिलेख, मुद्रांक विभाग, मालमत्ता कर विभाग, कंपनी नोंदणी विभाग, आरटीओ तसेच आवश्यकतेनुसार आयकर विभागाकडून अतिरिक्त माहिती घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित विकासकांची इतर जिल्ह्यांतील मालमत्ता शोधून 'आरआरसी' प्रक्रियेद्वारे वसुली केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांनीही सर्व संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन नियमित पुनरावलोकन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. वसुलीचे प्रमाण ३४ टक्क्यांवरून वाढविण्यासाठी पुढील काळात कठोर कारवाई केली जाईल, असे मंत्री देसाई यांनी स्पष्ट केले.

### संत सेवालाल महाराजांची जयंती साजरी

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२६, उदगीर (लातूर) :** उदगीर येथील म्हाडा कॉलनी जळकोट रोड व भगीरथ राजा नगर स्थानिक येथे बंजारा समाजाच्या आराध्य दैवत संत सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती बंजारा समाजाच्या वतीने व येथील रहिवाशांच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. गुरुवारी रोजी जयंती उत्सवा दरम्यान बंजारा समाजाच्या रूढी परंपरेनुसार संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना भोग (नैवेद्य) देण्यात आला. याप्रसंगी बंजारा महिला संघटना संस्थेच्या संस्थापिका व जयंती समितीच्या मुख्य संयोजिका सुमनबाई बळीराम राठोड व ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन संस्था महाराष्ट्र राज्य समितीचे संस्थापक प्रदेशाध्यक्ष बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर तसेच राजकीय तथा सामाजिक व्यक्तींनी संत सेवालाल महाराजांना पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. संत सेवालाल महाराज जयंती निमित्त बंजारा समाजातील म्हाडा कॉलनी व भगीरथ राजा नगर येथील समाज बांधवांनी आणि येथील युवकांनी सहभाग घेतला संत सेवालाल महाराज जयंती उत्सव पार पाडण्यासाठी जयंतीचे समितीच्या मुख्य संयोजिका सुमनबाई बळीराम राठोड, वसंत बळीराम राठोड, सुनिल राजाराम चव्हाण, निखील शिवाजी चव्हाण, मेघनाथ राठोड, गणेश राठोड, बालाजी पवार, सचिन आडे, पंडित सचिन पवार हरिश्चंद्र, आशाताई शिवाजी चव्हाण, वसंत भाऊ बळीराम राठोड, अंगणवाडी कर्मचारी आशा बळीराम राठोड-चव्हाण, महाराष्ट्र शासननियुक्त ग्राहक संरक्षण परिषदेचे शासननियुक्त अशासकीय सदस्य बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, पत्रकार संजय शिंदे अतनूरकर उपस्थित होते.

## आ. मुनगंटीवार यांचे मार्कंडा देवस्थानाची विकासकामे 'मिशन मोड'वर पूर्ण करण्याचे निर्देश

**» १४.८५ कोटींच्या कामांसाठी नियोजनबद्ध अंमलबजावणी करण्याच्या सूचना**

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२६,चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी गडचिरोली जिल्ह्यातील ऐतिहासिक मार्कंडा (मार्कंडेश्वर) शिवमंदिराच्या संवर्धन व परिसर विकासाला गती देण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. ही विकासकामे मिशन मोडवर राबवून २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश त्यांनी दिले. या संदर्भात मंत्रालयात वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत आ. मुनगंटीवार यांनी मार्कंडा देवस्थानाचा विकास मिशन मोडवर करण्याची गरज अधोरेखित केली. राज्य पुरातत्व विभाग व



जिल्हा नियोजन समितीमार्फत विदर्भातील संरक्षित स्मारके, ऐतिहासिक स्थळे, स्मृतिचिन्हे, मंदिरे तसेच युनेस्को वर्ल्ड हेरिटेज साईट्स यांच्या दुरुस्ती व देखभालीसाठी मंजूर १४ कोटी ८५ लक्ष रुपयांच्या कामांची अंमलबजावणी वेळेत व्हावी यासाठी विदर्भातील सर्व आमदारांची बैठक आयोजित करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. या संदर्भात मंत्रालयात वित्त राज्यमंत्री आशिषजी जयस्वाल यांच्या उपस्थितीत आयोजित बैठकीत आ. मुनगंटीवार यांनी मार्कंडा देवस्थानाचा विकास मिशन मोडवर करण्याची गरज अधोरेखित केली.

कामे निर्धारित वेळेत पूर्ण व्हावीत यासाठी त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले असून, ही समिती दर आठवड्याला प्रत्यक्ष भेट देऊन प्रगतीचा आढावा घेणार आहे. तसेच केंद्रीय पर्यटन मंत्री ना. गजेंद्रसिंह शेखावत यांना गडचिरोलीतील ऐतिहासिक स्थळांना भेट देण्यासाठी निमंत्रित करण्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. देवस्थान परिसरातील १०० मीटर व ३० मीटरच्या प्रतिबंधित क्षेत्रात कोणतेही नवीन बांधकाम अथवा अतिक्रमण होऊ नये यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, गडचिरोली यांनी स्थानिक ग्रामसेवकांना आवश्यक सूचना द्याव्यात, असे निर्देश देण्यात आले. याशिवाय, विकासकामे दोन टप्प्यांत होणार असताना दुसऱ्या टप्प्याच्या प्रशासकीय मान्यता व निधी मागणीसाठी झालेल्या तीन वर्षांच्या विलंबाबाबत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश एमएसआरडीसीला या बैठकीत देण्यात आले. बैठकीत मंदिराच्या जतनासाठी शास्त्रशुद्ध पुनर्निर्माण, प्राचीन वास्तूशैलीचे संवर्धन, भाविकांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे तसेच पर्यटनाच्या दृष्टीने सर्वांगीण विकास आराखड्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीला गडचिरोलीचे जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. श्री मार्कंडा शिव मंदिराचा विकास हा केवळ धार्मिक स्थळापुरता मर्यादित नसून गडचिरोलीच्या सांस्कृतिक ओळखीला बळकटी देणारा आणि पर्यटनवृद्धीस चालना देणारा महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असल्याचे आ. सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी नमूद केले.